दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
जा.क्र. शिउसं/प्राथ-२०२/२०२०-२०२१/ 4869
वेब साईट- WWW.dydepune .com
दिनांक : 27 JUL 2021

प्रति,

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे तथा सदस्य क्षेत्र स्तरीय प्राधिकरण
२. उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे तथा सदस्य सचिव, क्षेत्र स्तरीय प्राधिकरण

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत नवीन शाळा/दर्जावाढ करण्यास प्रस्ताव सादर करणेबाबत आनंद एज्युकेशन सोसायटी, दौंड पुणे संचलित ब्लॉसम इंग्लिश मिडिअम स्कुल, मु.पो.लिंगाडी,ता.दौंड,जि.पुणे

संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मुंबई कडील अधिसूचना दिनांक ५.१०.२०२०

२.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मुंबई कडील पत्र जा.क्र. संकिर्ण ४७२१/प्र.क्र. १७/एसएम-२ दिनांक १२.७.२०२१ या कार्यालयास प्राप्त दिनांक २३.७.२०२१

उपरोक्त विषयाबाबत क्षेत्रस्तरीय प्राधिकरणाची नियुक्ती याबाबत नियमामध्ये तरतूदी करण्यांत आली आहे. उपरोक्त स्वयंअर्थसहाय्यित नियमातील संदर्भीय क्र. १ शासन अधिसूचना दिनांक ५.१०.२०२० मधील नियम क्रमांक १५ अन्वये प्राप्त अधिकाराचां वापर करुन खालील नमूद संस्थांचा स्वयंअर्थसहाय्यित नविन शाळा ऑफलाइन अर्ज संदर्भीय क्र. २ नुसार शासनामार्फत खालीलनुसार या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

| अ क्र | संस्थेचे नांव | शाळेचे नांव | माध्यम | मंडळ | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | आनंद एज्युकेशन सोसायटी, दौंड पुणे | ब्लॉसम इंग्लिश मिडिअम स्कुल,मु.पो.लिंगाडी,ता.दौंड जि.पुणे | इंग्रजी | सी बी एस ई. | नविन प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा, (इ. १ ली ते १२ वी) सर्व शाखा |

**खालील बाबी संदर्भीय क्र. १ चे शासन अधिसूचना दिनांक ५.१०.२०२० मध्ये नमूद आहेत.**

**नियम क्रमांक : ९ : क्षेत्र स्तरीय प्राधिकरण प्रत्येक जिल्हयाकरिता एक क्षेत्र स्तरीय प्राधिकरण असेल क्षेत्र स्तरीय प्राधिकरणात पुढील सदस्यांचा समावेश असेल.**

क.संबंधित विभागाचा उपसंचालक : अध्यक्ष

ख.संबंधित जिल्हयाचा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) : सदस्य

ग. संबंधित जिल्हयाच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य : सदस्य

पुणे जिल्हा परिषद पुणे
शिक्षण विभाग (माध्यमिक)
दिनांक 28 JUL 2021